# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र. २९१

**गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब सादर करण्याबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी महाविद्यालय/परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/परिसंस्थेस बांबू प्रक्रिया प्रकल्प योजना व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपयोगी वस्तू खरेदी याकरिता सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे.

मंजूर अर्थसहाय्याच्या खर्चाचे वित्त व लेखा विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले हिशेब वित्त व लेखा विभागामार्फत गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत केंद्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे स्वीकारण्यात येणार आहेत.

| जिल्हा/शहर | वार व दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| नाशिक व अहिल्यानगर | शुक्रवार १३/१२/२०२४ | १०.३० ते ५ | शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. |
| पुणे शहर व पुणे जिल्हा (ग्रामीण) | शनिवार १४/१२/२०२४ | १०.३० ते ५ | शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. |

**सादर करण्यात येणाऱ्या हिशेबांचे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर महाविद्यालयांची/परिसंस्थांची बँक विषयक माहिती अद्ययावत असेल अशाच महाविद्यालयांची/परिसंस्थांना रक्कम NEFT द्वारे नोंद केलेल्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे. याकरिता आपल्या महाविद्यालयांचा College PUN Code मुखपृष्ठावर नमूद करण्यात यावा.**

तसेच ज्या महाविद्यालयांची/परिसंस्थांची विद्यापीठाच्या संकेतस्थळावर बँक विषयक माहिती अद्ययावत केलेली नाही. अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी खालील लिंकवर जाऊन

University Home Page_>BOD_>BOD Online_>Login_>For College Users_>After College Login to Main Menu_>Click College Details_>Click Finance Bank Details

माहिती अपलोड करण्यात यावी व पुढील billunit@unipune.ac.in या ई-मेलवर महाविद्यालयाचे नाव व College PUN Code कळविण्यात यावा, त्यानुसार बँक खात्यावर रक्कम वर्ग करण्यात येईल.

शिबीराच्या ठिकाणी नियोजन व विकास विभागाने महाविद्यालय/परिसंस्थेच्या मंजूर यादीत नमूद केलेल्या त्रुटी, इत्यादी कागदपत्रांच्या पूर्ततेचे प्रमाणिकरण केल्यानंतरच केंद्रीय लेखा परिक्षण शिबीराच्या ठिकाणी हिशेब सादर करण्यात यावेत.

सदर कालावधीत महाविद्यालय/परिसंस्थांकडून विद्यापीठास हिशेब सादर न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२४-२५/६३६
दिनांक : ०४ डिसेंबर, २०२४

सीएमए (डॉ.) चारुशीला गायके
वित्त व लेखा अधिकारी

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, मान्यताप्राप्त परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
३. मा. प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
४. सहायक कुलसचिव, नियोजन व विकास विभाग.